पूर्वा कृषिदूत
प्रबोधनातून परिवर्तन... मासिक

संस्थापक संपादक
**डॉ. बी.बी. पवार**

संपादक
**डॉ. भास्कर गायकवाड**

संपादन सहयोग
**पराग वाड**

चित्रांकन आणि मांडणी
**कैलास भामरे**

मुखपृष्ठ
**विजय सैंदाणे**

व्यवस्थापक - लेखा विभाग
**राजेंद्र बागुल**

सहकार्य
**विजय पवार**
संचालक, पूर्वा ॲग्रोटेक

**सुहास कदम**
संचालक, पूर्वा ॲग्रो मार्केटिंग

**महेश पाटील**
संचालक, पूर्वा केमटेक, खान्देश

**विजय नाईकरे**
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, पुणे

**सचिन दिघे**
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, संगमनेर

**रईस इनामदार**
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, कोपरगाव

**नंदकिशोर चतरकर**
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, विदर्भ

**संजय पाटील**
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, मराठवाडा

■

**पूर्वा केमटेक प्रा.लि.,**
एम ११३, एमआयडीसी अंबड,
नाशिक-४२२०१०
मो. ७४२००१४७८१
email:poorvakrushidoot@gmail.com

# संपादकीय

## रासायनिक कृषिनिविष्ठांचं विष साऱ्या सजीव सृष्टीला भोवतं आहे!

**पर्यावरणाचा होतोय ऱ्हास; माणूस रोगराईचा दास**



**डॉ. भास्कर गायकवाड**
(संपादक : 'पूर्वा कृषिदूत')
मो. ९८२२५१९२६०
gaikwadbh@yahoo.com

- ■ भूमाता, गोमाता आणि पर्यायाने मानवाची माताही संकटग्रस्त
- ■ रासायनिक घटकांचा अतिवापर विषारी अन्नाच्या केंद्रस्थानी
- ■ विवेकशून्य कृषी उत्पादन तंत्रामुळे ओढवली आपत्ती
- ■ 'सुरक्षित निर्याती'चा निकष 'देशांतर्गत उत्पादना'त मात्र दुर्लक्षित
- ■ ग्राहकानेच जागरूकतेने करावी सेंद्रिय कृषिमालाची मागणी
- ■ सर्व स्तरांवर विषमुक्त शेतीच्या प्रबोधनाची निकड

अलिकडे आपल्या देशात मधुमेह, हृदयविकार, किडनीचे आजार, कॅन्सर, पोटाचे आजार, डोळ्यांचे आजार अशा प्रकारचे अनेक विकार वाढत चालले आहेत. या विकारांची मुळे नवजात बालकाला आईकडून होणाऱ्या स्तनपानात असतात, असे विधान करणे चमत्कारिक वाटत असले, तरी ती एक लाजिरवाणी वस्तुस्थिती आहे! मातांच्या दुधातून बालकांच्या पोटात रोगकारक घटक जाण्याचे कारण स्तनदा मातांच्या रसायनांचे अंश असलेल्या आहारात दडलेले आहे. देशातील ८५ टक्के मातांच्या दुधामध्ये विषारी द्रव्यांचे प्रमाण ठरवून दिलेल्या पातळीच्या वर आहे! आईच्या उदरामध्ये बाळाची वाढ होत असतानाही त्याला जणू अप्रत्यक्षपणे विषाचा खुराक सुरू असतो. तसे बघता गरोदर महिलेला चांगली फळे-भाजीपाला खायला दिला जातो. परंतु त्याच्यामध्ये रासायनिक कीटकनाशकांची पातळी निर्धारित प्रमाणापेक्षा कितीतरी जास्त असते! म्हणून जन्माला येणाऱ्या बाळाच्या रक्तात कीटकनाशकांचा अंश असतो आणि वरून जन्मदात्या आईच्या दुधातूनही रासायनिक कीटकनाशकांचा अंश त्याच्या पोटात जात असतो.

**अन्नस्रोत दूषित झाल्याने गंडांतर...**

जन्मदात्या आईच्या दुधानंतर मुलांना दुसरी माता; जिला गोमाता म्हटले जाते तिचे दूध दिले जाते. दुधाला पूर्णान्न म्हटले जाते. परंतु यामध्येही मोठ्या प्रमाणात रासायनिक कीटकनाशकांचे अंश सापडत आहेत. मुलांच्या चांगल्या पोषणासाठी बेबी फूड दिले जाते. बेबी फूड तयार करण्यासाठी प्रथिने मोठ्या प्रमाणात वापरतात आणि ही प्रथिने डाळवर्गीय पिकांपासून तयार केली जातात. डाळवर्गीय पिकांमध्येही

कीटकनाशकांचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. तसेच मुलांना जास्तीतजास्त फळे, भाजीपाला देण्यास सांगितले जाते. याचे उत्पादन आपली तिसरी माता म्हणजे भूमाता करत असते. एकूण फळे-भाजीपाल्यापैकी ५५ टक्के शेतीमालात प्रमाणापेक्षा जास्त कीटकनाशकांचा अंश आढळतो. यावरून एक लक्षात येईल की जन्माच्या अगोदरपासून ते मुलांची वाढ चांगली होईपर्यंत आपल्या तीनही माता मुलांचे संगोपन करतात आणि त्यासाठी दुर्दैवाने त्यांच्या हातात आला आहे विषाचा पेला! कोणतीही माता खरंच आपल्या मुलाला विष देण्यासाठी तयार असते काय? याचे उत्तर अर्थातच नकारार्थी आहे. परंतु तिचा अन्नस्त्रोतच दूषित झाल्याने अनवधानाने तिच्या हातून हे पाप घडते आहे! हे विष पचवणारे तिचे अपत्य कसे निपजेल, त्याचे उत्तर माहीतच आहे!

**निरोगी स्वावलंबनापासून रोगट परावलंबनाकडे...**

पूर्वीच्या काळी आहाराला विशेष महत्त्व दिले जात होते. खाण्याच्या सवयीनुसार पीकपध्दती आणि शेतीपध्दती होती. प्रत्येक भागातील हवामानानुसार पिकांचे वाण होते. त्यामुळे निसर्गामध्ये जैवविविधता टिकून होती. योग्य पीकपध्दती, फेरपालट, आंतरपीक, मिश्रपीक पध्दतीमुळे निसर्गत: पिकांचे पोषण, कीडरोगांचे नियंत्रण साधत होते. नैसर्गिक साधनांचा योग्य वापर करून मिळविलेले शेती उत्पादन सकस, निरोगी आणि उत्कृष्ट प्रतीचे असल्यामुळे त्यापासून निरोगी आणि विचारी समाज तयार झालेला होता. परंतु हरितक्रांतीनंतर यामध्ये आमूलाग्र बदल झाला. जास्त उत्पादन मिळविण्याच्या हव्यासापोटी कोणताही मार्ग अवलंबला तरी हरकत नाही, असा संदेश रूजला! आपल्या पारंपरिक तंत्रज्ञानाला तिलांजली देऊन पाश्चिमात्य तंत्रज्ञान डोक्यावर घेतले गेले. जास्त उत्पादन मिळविण्यासाठी संकरित वाणांचा वापर वाढला. त्यांना जास्त पाणी, खते, कीटकनाशके आवश्यक ठरू लागली. फळे पिकविण्याच्या नैसर्गिक पध्दतीला जास्त वेळ लागतो, फळांना चांगला रंग येत नाही, म्हणून ती कृत्रिमरित्या पिकविण्यासाठी रसायनांचा अतिरेकी वापर सुरु झाला. याचा दुष्परिणामही मानवी आरोग्यावर होत आहे. अशा प्रकारे पूर्वी जे शेतकरी- गाव पूर्णपणे स्वावलंबी होते; ते हळूहळू परावलंबी होऊ लागले. जास्त उत्पादन मिळत गेले परंतु उत्पादन खर्च वाढत गेला. पाणी कमी होत गेले. जमिनी खराब होऊ लागल्या. निसर्गाचे संतुलन बिघडले. अशा संतुलन बिघडलेल्या निसर्गात पिकांची नैसर्गिक वाढ होण्याचे प्रमाण कमी झाले. मग अनैसर्गिक पध्दतीने त्यांची वाढ साध्य करण्यासाठी रसायनांचा वापर वाढला. खरंच आपणास जास्त उत्पादन मिळवून; वाढलेल्या लोकसंख्येला अन्न खाऊ घालायचे म्हणून विषारी अन्नपाणी देऊन विकृत समाज घडवायचा आहे काय? लोकसंख्या वाढतेय म्हणून निकृष्ट प्रतीचे शेतीमाल उत्पादन घ्यायचे की सुसंस्कृत समाज घडविण्यासाठी लोकसंख्येवर नियंत्रण ठेवायचे; यापैकी एकच पर्याय आपल्यासमोर आहे.

**कीटकनाशकांचा घातक प्रमाणातील वापर...**

ज्या प्रगत देशांमधून आम्ही रासायनिक शेतीचे तंत्रज्ञान आणून उत्पादन काढतो ते देश आज आमचे उत्पादन घ्यायला तयार नाहीत. अनेक कीटकनाशकांवर जागतिक पातळीवर बंदी असतानाही आपल्या देशामध्ये त्यांचा सर्रास वापर केला जातो. फक्त परदेशी पाठविण्यासाठीच्या शेतीमालाला मात्र अशी कीटकनाशके वापरली जात नाहीत. प्रगत देशातील रासायनिक तंत्रज्ञानाला महत्त्व आले. त्यांनी दिलेला विषाचा पेलाही आम्हाला अमृत वाटतो. मात्र आमचे पारंपरिक ज्ञानरुपी अमृत त्यांनी अनेकदा पळविण्याचा प्रयत्न केलेला आहे. हळद, कडुलिंब, गोमूत्र, बासमती तांदूळ यासारख्या अनेकविध कृषी उत्पादनांच्या तंत्रज्ञानापासून आम्ही बाजूला गेलो. मात्र ते तंत्रज्ञान उचलण्याचा त्यांनी प्रयत्न केला! अर्थात 'तुझे आहे तुजपाशी, परि तू जागा चुकलाशी' अशी आमची परिस्थिती झालेली आहे. प्रगत देशांमध्ये रसायनविरहित, सेंद्रिय शेती पध्दतीने पिकविलेल्या अन्नधान्याला मोठी मागणी आहे कारण रसायनयुक्त आहारामुळे काय आपत्ती येऊ शकते याची त्यांना चांगलीच जाणीव झालेली आहे. त्यांच्याकडे पैसा, समृध्दी असली तरी अशाश्वत जीवन, अशांतता, लोप पावत चाललेली संस्कृती या प्रकारच्या समस्या आहेत. कोणावरही कोणाचा विश्वास नाही. समाज आहे पण सामाजिक विचार नाही. कुटुंबे आहेत पण कौटुंबिक विचार नाही. समृध्दी आहे परंतु समाधान नाही. आहार आणि आरोग्याचा परिणाम जीवनशैलीवर होतो असे म्हटले जाते. म्हणजेच जसा आहार तसा विहार. या साऱ्याचा विचार करता नैसर्गिक, सेंद्रिय शेती पध्दतीने पिकविलेल्या मालाला ते जास्त पैसे मोजत आहेत. म्हणजेच चांगल्या आरोग्यासाठी चांगला आहार आणि त्यासाठी जास्त खर्च करण्याची तयारी त्यांच्याकडे आहे. कडूलिंब, तेल, तेलबिया, पेंडी, बासमती तांदूळ यासारख्या चांगल्या प्रतीचा माल आम्ही प्रगत देशात निर्यात करून रासायनिक खते, कीटकनाशके आणि कमी प्रतीचा शेतीमाल आयात करत आहोत!

### बळीराजा घेतोय स्वत:चाच बळी...

आज देशामध्ये मोठ्या प्रमाणात रासायनिक कीटकनाशकांचा वापर होतो. जगात कीटकनाशकांचे आम्ही दोन नंबरचे उत्पादक असून; वापर करण्यामध्ये तिसऱ्या क्रमांकावर आहोत. कपाशीसारख्या एकाच पिकावर ५० ते ५५ टक्के रासायनिक कीटकनाशकांचा वापर होतोय. शेतकऱ्यांच्या जास्तीत जास्त आत्महत्याही कपाशी करणाऱ्या भागामध्येच दिसून येतात. विविध कीटकनाशकांच्या 'कॉकटेल'ची फवारणी करूनही कीड-रोग त्याला दाद देत नाहीत. त्यामुळे पिकांचे उत्पादन घटते. मग हेच 'कॉकटेल' पिऊन शेतकरी नैराश्यापोटी आत्महत्या करत आहेत! ही विकृती आपली संस्कृती नव्हे. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली तरीही आमचा बळीराजा स्वत:चाच बळी घेत आहे ही देशातील मोठी शोकांतिका आहे. ही भविष्यातील एका मोठ्या वावटळीची सुरुवात आहे. रासायनिक शेती पध्दतीने सर्व काही झटपट आणि वेळेच्या अगोदर येते मग ते उत्पादन असो की पैसा अशी (चुकीची) मानसिकता तयार झालेली आहे. याचाच परिणाम आज जीवनावरही होऊन निरुपायाने झटपट जीवन संपवण्याचा प्रयत्न होत आहे. रासायनिक पध्दतीने शेती व्यवसाय अशाश्वत झाल्यामुळे त्यातून मिळालेले अन्न खाऊन माणसाचे जीवनही अशाश्वत झालेले आहे. निसर्गामध्ये 'जीवो जीवस्य जीवनम्' या पध्दतीने प्रत्येक कीड-रोगाचे नियंत्रण हजारो वर्षांपासून होत आहे. तसेच नसते तर रासायनिक कीटकनाशकांचा वापर होण्या अगोदरच सर्व वनस्पतींच्या प्रजातींचा नाश झाला असता. परंतु हे सर्व ज्ञान आणि जैवविविधता आमच्याजवळ असूनही त्यावर विश्वास बसत नाही. कारण रासायनिक शेतीच्या पूर्णपणे आहारी गेलेल्या शेतकरी समाजाला अजूनही योग्य दिशा देण्याचा प्रयत्न होत नाही. ती दिशा देण्याचे काम संशोधक, विस्तारक, शासन तर करतीलच परंतु त्याहीपेक्षा सर्वात पहिली दिशा देण्याचे काम ग्राहकाने केले पाहिजे; याचे कारण एकदा ग्राहकच जागरूक झाला तर शेतकऱ्यांना त्याच्या मागणीनुसार तंत्रज्ञान वापरावे लागेल. ग्राहकांनीच रसायनविरहित अन्नपदार्थांची मागणी केली तर मग शेतकऱ्यांना तसे पिकवावेच लागेल.

### जैविक उपायांविषयी प्रबोधन गरजेचे...

भारत देश जैवविविधतेच्या बाबतीत जगात पहिल्या क्रमांकावर आहे. या जैवविविधतेमुळे निसर्गाचे संतुलन राहते. रसायनांचा शरीरावर काय दुष्परिणाम होतो याचा विचार करून, रासायनिक पध्दतीने उत्पादन घेतलेल्या शेतीमालापासून दूर राहण्यासाठी ग्राहकांच्या योग्य प्रबोधनाची गरज आहे. कीड-रोगांचे प्रमाण कमी करायचे असेल तर पहिल्यांदा पिकाचे योग्य पोषण केले पाहिजे. जमिनीला योग्य पध्दतीचा आहार दिला पाहिजे. जमीन कसदार ठेवण्यासाठी सेंद्रिय खतांचा वापर, पिकांची योग्य पध्दती, हिरवळीच्या खतांचा वापर, जिवाणू खतांचा वापर, गांडूळ खतांचा वापर वाढविणे गरजेचे आहे. शक्य असेल तेथे संकरित वाणांचा वापर टाळणे, पाण्याचा कमीतकमी वापर करणे, पिकांची वाढ होण्यासाठी पोषकांचा आणि नत्रयुक्त खतांचा जास्त वापर टाळणे गरजेचे आहे. पिकांची नैसर्गिक वाढ झाली तर रोग-किडींचे प्रमाण कमी राहते. रोग-किडी काही प्रमाणात असल्या तरी त्यांचे नियंत्रण मित्रकिडींद्वारे होते. मित्रकिडींद्वारे पीकसंरक्षण झालेच नाही तर आपल्याकडे अशा अनेक वनस्पती आहेत की ज्यांच्या अर्कामुळे पीकसंरक्षण करता येते. तसेच गोमूत्रासारखे चांगले साधन आहे, त्याद्वारेही पीकसंरक्षण करता येते. रासायनिक कीटकनाशके हे शेवटचे हत्यार आहे. सर्व पर्याय संपल्यानंतरच त्यांचा वापर केला पाहिजे. विषारी अन्न खाऊन आरोग्य बिघडलेला माणूस दवाखान्याच्या चक्रव्यूहामध्ये अडकला आहे. अशा माणसाला या चक्रव्यूहातून बाहेर काढता येईल. विषरहित, निरोगी आणि नैसर्गिक आहार दिल्यामुळे मानवामध्ये प्रतिकारशक्ती वाढेल. त्यामुळे निसर्गातील बदलाला सामोरे जाण्याची क्षमता निर्माण होईल. कारण जो समाज स्वत: निरोगी-शक्तिमान असेल तोच देशाचा विकास करेल. त्यासाठी या रसायनांच्या मृगजळातून बाहेर पडण्याची आवश्यकता आहे. निसर्गामध्ये विहार करून पौष्टिक आहार घेतला तर हा समाज सुसंस्कृत, कार्यक्षम आणि निरोगी होईल. यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याची गरज आहे. ■

हे मासिक मालक, मुद्रक, प्रकाशक **संजय भास्कर पवार** यांनी निर्मल ऑफसेट प्रा.लि., बी २७, एम.आय.डी.सी. माळेगाव, ता. सिन्नर, जि. नाशिक येथे छापून ४, मिथिला अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्राजवळ, दातेनगर, गंगापूर रोड, नाशिक- ४२२०१३ येथे प्रकाशित केले.

संपादक : **डॉ. भास्कर गायकवाड.**

* या अंकातील लेखांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.